

रेल्वेतून चोरीस गेलेले दागिने पोलिसांकडून स्वीकारताना इंदूमती वझे. सोबत त्यांचे पती गंगाराम वझे.

# चोरीतील मुद्देमाल तक्रारदाराकडे सुपूर्द

लोकमत न्यूज नेटवर्क

म्हापसा : हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेसमधून येताना मिरज येथे कोलवाळ-गोवा येथील इंदूमती वझे यांची उशीखालच्या पर्समध्ये पावणेदोन लाख रुपयांचे दागिने असलेले गेल्या ७ जुलै २०१९ रोजी रात्री ११ वाजता पर्स चोरीस गेली होती. ही चोरी करणाऱ्या भाग्यराज ल्युकस दारला (१९) याला अटक करण्यात आली.

या वेळी तिला जाग येताच तिने आरडा ओरडा करून चोरला पकडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्या नातेवाईकांच्या लग्नाहून गोव्याला परत येत होत्या.

मिरज लोहमार्ग पोलिसांनी चोराला पकडून त्याच्याकडून चोरीचे पावणेदोन लाखाचे दागिने गेल्या दोन दिवसापूर्वी जप्त केले व केवळ सहा महिन्यात कोर्ट ऑर्डर होऊन फिर्यादीला त्यांचा ऐवज परत करण्यात आला.

मिरज लोहमार्ग पोलीस अधीक्षक सत्यजीत अदमाने तपास करणाऱ्या महिला उपनिरीक्षक रुपाली उबाळे त्यांचे सहकारी एम. टी. माने, श्री पी.बी. सूरवसे, ए. ए. सावंत, सिंगाडे, पटेल व व्ही. एम. कदम या टीमने सापळा रचून या चोरट्यास अटक केली.

इंदूमती वझे यांना त्यांचे दागिने स्वाधीन केले. याबद्दल इंदूमती वझे व त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांचे आभार मानले.

Scanned by CamScanner